MHAH220028852015

नियमित दिवाणी दावा क्र. २२०/२०१६
रमल वि. मोतीराम व इतर

आदेश
(नि.क्र.८६ खाली)

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहितेच्या ऑर्डर ६ रुल १७ प्रमाणे दावा दुरुस्तीकामी दाखल केला आहे.

२. अर्ज व अर्जावरील म्हणणे वाचले. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

३. अर्जदार/वादीचे थोडक्यात कथन असे आहे की, सदरचा दावा वादीने प्रतिवादींविरुध्द वाटपासाठी दाखल केला आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. १ यांनी दाव्यात हजर होऊन कैफियत दिलेली असताना दावा कलम १ मध्ये वर्णन केलेल्या गट क्र. ४१० व ४७६ या जमिनी मधील त्यांच्या नावावर असलेले संपुर्ण क्षेत्र दि. ३०/०५/२०२५ रोजी नोंदणीकृत बक्षिसपत्राने त्यांची मुले रत्नदिप मोतीराम शिंदे व किरण मोतीराम शिंदे यांचे नावे दिलेले आहे. दावा कलम १ मधील मिळकतीत वादीचा हक्क व हिस्सा आहे. सदर बक्षिसपत्र वादीच्या हिश्यावर बंधनकारक नाही. त्यामुळे वादीने प्रतिवादी क्र. १० नंतर प्रतिवादी क्र. ११ रत्नदिप मोतीराम शिंदे व प्रतिवादी क्र. १२ म्हणुन किरण मोतीराम शिंदे यांना दाव्यामध्ये सामाविष्ट करण्याची विनंती केली आहे व सदर बक्षिसपत्राच्या अनुशंगाने दाव्यामध्ये इतर दुरुस्ती करण्याची परवानगी देखील वादीने मागितली आहे.

४. प्रतिवादी क्र. १ तर्फे वकीलांनी सदर अर्जावर म्हणणे दिले आहे व असे कथन केले आहे की, सदर वादीचा अर्ज कायदेशीर नाही सदर अर्जातील मजकुर खरा नाही. प्रतिवादी क्र. १ ने नि.क्र.३६ ला कैफियत देऊन कथन केले आहे की, गट क्र. ४१० ही त्यांची स्वकष्टार्जित मिळकत आहे. त्यामुळे वादीचा त्या मिळकतीत हक्क व हितसंबंध नाही. सदरची दुरुस्ती केल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होणार आहे. त्यामुळे वादीचा अर्ज रद्द करण्यात यावा अशी प्रतिवादी क्र. १ यांनी विनंती केली आहे.

५. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. अभिलेखाचे अवलोकन केले

असता असे दिसून येत आहे की, वादीने प्रतिवादी विरुध्द वाटपासाठी सदर दावा दाखल केलेला आहे. अभिलेखावर नि.क्र.८९ यादीसोबत दाखल केलेला दस्त क्र. २६७५/२०२० सत्यप्रतीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, लिहुन देणार म्हणुन मोतीराम विनायक शिंदे व लिहून घेणार म्हणुन रत्नदिप मोतीराम शिंदे व किरण मोतीराम शिंदे यांची नावे आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्र. ११ रत्नदिप मोतीराम शिंदे व प्रतिवादी क्र. १२ म्हणुन किरण मोतीराम शिंदे यांना वादपत्रात प्रतिवादीपणात सामाविष्ट करणे न्यायोचीत होईल. वादीने सदरचा अर्ज विलंबाने दिल्यामुळे वादीने प्रतिवादीला खर्च देणे गरजेचे आहे. म्हणून मी खालीप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) अर्ज खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

२) प्रतिवादी क्र. ११ रत्नदिप मोतीराम शिंदे व प्रतिवादी क्र. १२ म्हणुन किरण मोतीराम शिंदे यांना दाव्यातील वादपत्रात सामिल करण्याची वादी यांना परवानगी देण्यात येते व त्याबद्यलची दुरुस्ती वादीने पुढील तारखेपर्यंत करावी.

३) वादीने अर्जात नमुद केलेली इतर दुरुस्ती करण्याची परवानगी देखील वादीला देण्यात येते व त्याबद्दलची दुरुस्ती प्रतिदाव्यातील वादीने पुढील तारखेपर्यंत करावी.

४) वादीने सदरचा अर्ज विलंबाने दिल्यामुळे वादीने आक्षेप घेणारे प्रतिवादींना खर्च म्हणुन रक्कम रुपये १,०००/- (रुपये एक हजार मात्र) देण्यात यावे.

RAMRAO BABURAO RAUT
Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2026.01.09 17:12:14 +0530

(आर. बी. राऊत)
२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कर्जत, जि. अहमदनगर.

स्थळ : कर्जत.
दिनांक :०९/०१/२०२६.